# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 17 June 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १७ जून २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- पश्चिम बंगालमध्ये रेल्वे अपघातात नऊ जणांचा मृत्यू तर ५० हून अधिक प्रवासी जखमी.
- जालना जिल्ह्यात उपोषणकर्त्या ओबीसी आंदोलकांचं शिष्टमंडळ मुंबईला चर्चेसाठी जाणार.
- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका सक्षम काढण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील.

आणि

- त्यागाची शिकवण देणारा बकरी ईदचा सण सर्वत्र भक्तिभावानं साजरा.

****

पश्चिम बंगालमध्ये दार्जिलिंग जिल्ह्यात रेल्वे अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला असून, ५० हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. यापैकी नऊ प्रवासी गंभीर जखमी असल्याचं, वृत्त आहे. रंगापानी रेल्वे स्थानकाजवळ आज सकाळी कंचनजंगा जलदगती रेल्वेला मालगाडीने पाठीमागून धडक दिल्याने, कंचनजंगा एक्सप्रेसचे काही डबे रुळावरुन घसरून हा अपघात झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. पंतप्रधान मोदी यांनी मृतांच्या वारसांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून दोन लाख, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी घटनास्थळी पोहोचून पाहणी केली, तसंच रुग्णालयात जाऊन जखमींची चौकशी केली. मृतांच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपये तर गंभीर जखमींना अडीच लाख रुपये रेल्वेमंत्र्यांनी मदत जाहीर केली आहे. या अपघाताच्या पार्श्वभूमीवर ईशान्येकडे जाणाऱ्या मार्गावरच्या अनेक रेल्वेगाड्या सध्या रद्द करण्यात आल्या आहेत.

****

नागपूर शहरात मद्यधुंद अवस्थेत असलेल्या कारचालक युवकाने पदपथावर झोपलेल्या ९ जणांना चिरडले असून यात २ महिलांचा मृत्यू झाला तर इतर ७ जण जखमी झाल्याचं वृत्त आहे. काल मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास हा अपघात झाला. या प्रकरणी पोलीसांनी वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या सहा युवकांना ताब्यात घेतलं, त्यावेळी हे सर्व जण मद्याच्या अंमलाखाली असल्याची माहिती पोलीसांनी दिली आहे.

****

लोकसभा निवडणुकीत मुंबई उत्तर-पश्चिम मतदार संघातील मतमोजणीबाबत प्रसिद्ध केलेली बातमी खोटी असल्याचं, सांगत मिड डे या इंग्रजी वृतपत्राने माफी मागितली आहे. ही बातमी सामाजिक माध्यमांवर सामायिक करणाऱ्या महाविकास आघाडीच्या नेत्यांनीही जाहीर माफी मागावी, अशी मागणी शिवसेना उपनेते आणि प्रवक्ते संजय निरुपम यांनी केली आहे. ते आज मुंबईत यासंदर्भातल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

दरम्यान, याच मतमोजणी केंद्रात मतमोजणीच्या दिवशी शस्त्रधारी पोलीस संरक्षकासह प्रवेश केल्याप्रकरणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार विलास पोतनीस यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशीची मागणी खासदार रविंद्र वायकर यांनी केली होती, त्यांच्या तक्रार अर्जाची दखल घेत हा गुन्हा दाखल करण्यात आला.

****

ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नये या मागणीसाठी, जालना जिल्ह्यात वडीगोद्री इथं उपोषणकर्त्या आंदोलकांच्यावतीनं आज सायंकाळी पाच सदस्यीय शिष्टमंडळ मुंबईला जाणार आहे. सरकार या शिष्टमंडळाशी त्यांच्या मागण्याबाबत चर्चा करणार आहे. दरम्यान, राज्य सरकारच्या शिष्टमंडळानं आज सकाळी या आंदोलकांची भेट घेत उपोषण मागे घेण्याची विनंती केली होती. ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, असं लेखी आश्वासन सरकारनं द्यावं, अशी मागणी उपोषणकर्ते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी केली आहे.

****

राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचं, सहकार मंत्री दिलीप

वळसे पाटील यांनी म्हटलं आहे. पुणे इथं राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या आर्थिक स्थितीबाबत आज घेतलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. विविध योजनांतर्गत बँकांना अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याबाबत शासन आग्रही आणि सकारात्मक आहे, अशी माहीती वळसे पाटील यांनी दिली.

****

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामध्ये काम करत असलेल्या महाराष्ट्र आणि मुख्य कार्यालयातल्या ६१ कर्मचाऱ्यांच्या बडतर्फीला स्थगिती देण्याची, मागणी महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केली आहे. ते आज मुंबईत एका पत्रकार परिषदेत बोलत होते. महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश मोहिते यांची बदली करण्यात यावी, तसंच नव्याने दोनशे कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणीही करणार असल्याचं पाटील यांनी सांगितलं.

****

'येत्या २१ जून रोजी साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची तयारी जगभरात मोठ्या उत्साहात सुरु आहे. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भद्रासनाची माहिती देणारी एक चित्रफित सामाजिक माध्यमांवर सामायिक केली आहे. भद्रासनाचा सराव केल्याने सांधे मजबूत होतात, गुडघेदुखी कमी होते, पोटाच्या समस्या दूर ठेवण्यासाठी देखील हे आसन उपयुक्त असून, याचा सर्वांनी सराव करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमाच्या १११व्या भागात या महिन्याच्या अखेरच्या रविवारी, येत्या ३० जूनला देशवासियांशी संवाद साधणार आहेत.

****

१८व्या `मिफ` अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आज तिसरा दिवस आहे. प्रतिष्ठेच्या बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी गेल्या काही वर्षांत निवडल्या गेलेल्या काही निवडक चित्रपटांसोबत रशिया, इराण, इटली इत्यादी देशांचे, तसंच भारतीय लघुपट, माहितीपट आणि ॲनिमेशनपट आज दाखवण्यात येत आहेत. बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी निवड झालेल्या `गुमनाम दिन` या माहितीपटाच्या दिग्दर्शक एकता मित्तल यांनी आज वार्ताहरांशी संवाद साधला. रोजगाराच्या शोधात बंगळुरूमध्ये आलेल्या स्थलांतरित मजुरांची कहाणी

या माहितीपटात मांडली आहे. या माहितीपटाची प्रक्रिया, भावनिक गुंतवणूक आणि या प्रक्रियेने दिलेले धडे एकता मित्तल यांनी उलगडून सांगितले.

****

छत्रपती शिवाजी महाराजांच्या तिनशे पन्नासाव्या राज्याभिषेक दिनानिमित्त येत्या २६ जून ते २९ जून दरम्यान जळगाव इथं पहिलं शिवचरित्र साहित्य संमेलन आयोजित करण्यात आलं आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी 'शककर्ते शिवराय' या प्रसिद्ध ग्रंथाचे लेखक विजयराव देशमुख यांची निवड झाली आहे. आज नागपूर इथं संमेलनाचे निमंत्रक प्राचार्य लक्ष्मणराव देशमुख आणि नियंत्रक रवींद्र पाटील यांनी माहीती दिली. जळगाव इथल्या नूतन मराठा महाविद्यालयाच्या प्रांगणात हे संमेलन होणार आहे. छत्रपतींच्या वंशजांची या संमेलनाला प्रमुख उपस्थिती राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

****

बकरी ईदचा सण आज सर्वत्र भक्तिभावानं साजरा झाला. पारंपरिक पद्धतीनं नमाज पठणासह इतर कुर्बानी आणि इतर धार्मिक विधी पार पडले. छत्रपती संभाजीनगर इथं महापालिकेनं तीन ठिकाणी केलेल्या तात्पुरत्या कत्तलखान्यात आज म्हैस तसंच बकरीवर्गीय सुमारे शंभर जनावरांची कुर्बानी देण्यात आल्याचं, महापालिकेकडून जारी पत्रकात म्हटलं आहे.

****

लातूर शहरासह जिल्ह्यात ठिकठिकाणी बकरी ईद पारंपरिक पद्धतीने साजरी करण्यात आली. लातूर शहरातील ईदगाह मैदानावर सामुहिक नमाज पठण करण्यात आलं. त्यानंतर जगभरात शांततेसाठी सामुहिक प्रार्थना करण्यात आली. लातूर लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित काँग्रेस खासदार डॉ.शिवाजी काळगे, जिल्हा पोलिस अधीक्षक सोमय मुंडे यांच्यासहित अनेक मान्यवरांनी ईदगाह मैदानावर उपस्थित राहून ईदच्या शुभेच्छा दिल्या.

****

जालना शहरासह जिल्ह्यात बकरी ईद पारंपरिक पध्दतीनं उत्साहात साजरी करण्यात आली. जालना शहरातल्या कदीम ईदगाह मैदानावर मुस्लीम समाज बांधवांनी सामुहिक नमाज अदा करून विशेष प्रार्थना केल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

ज्ञानराधा मल्टिस्टेट कोऑपरेटिव्ह बँकेचे संचालक संजय कुटे आणि इतर पाच जणांविरुध्द जालना जिल्ह्यातल्या अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अंबड शहर आणि तालुक्यातल्या सुमारे १२५ ठेवीदारांची सुमारे ७० ते ८० कोटी रुपये मुदतठेव ज्ञानराधा मल्टिस्टेट बँकनं परत न देता फसवणूक केल्याची तक्रार व्यावसायिक लक्ष्मण सावंत यांनी केली, त्यानुसार ही कारवाई करण्यात आली. या बँकेतल्या संबंधित ठेवीदारांनी आपल्या कागदपत्रांसह जिल्हा आर्थिक गुन्हे शाखेशी संपर्क करण्याचं आवाहन पोलीस प्रशासनानं केलं आहे.

****

लातूर पोलिसांनी अवैध पिस्तुल बाळगल्या प्रकरणी एका तरुणाला अटक केली. त्याच्याकडून पिस्तुलासह दोन जिवंत काडतुसं आणि मॅगझीन जप्त करण्यात आलं. महेश दिनकर कुलकर्णी असं या तरुणाचं नाव आहे. याप्रकरणी औसा तालुक्यात भादा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीला एका प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा झाली असून सध्या तो जामिनावर त्याच्या मूळ गावी आला असता, त्याच्याकडे पिस्तुल आढळल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

****

जालना पोलीस दलात पोलीस शिपाई पदाच्या १०२ आणि चालक पदाच्या २३ जागांसाठी परवा १९ जूनपासून पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर भरती प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. यासाठी सहा हजार ९७८ अर्ज प्राप्त झाले आहेत. पात्र उमेदवारांची मैदानी चाचणी होणार असून, यात उत्तीर्ण उमेदवारच लेखी परीक्षेस पात्र असतील. उमेदवारांनी कुठल्याही अमिषाला बळी पडू नये, असं आवाहन पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी केलं आहे.

****